# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र. २०
# सभा क्र.२५, दिनांक २०/०८/२०२४ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक तहकूब सभा (शुक्रवार, दि. १६/०८/२०२४ रोजीची) मंगळवार, दि. २०/०८/२०२४ रोजी दुपारी ४.००(चार) वाजता मा. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| मा. डॉ राजेंद्र ब भोसले | - | प्रशासक तथा महापालिका आयुक्त, पुणे मनपा |
| मा. पृथ्वीराज बी. पी. | - | मा. अति. महा. आयुक्त (इ) |
| मा. सौ. योगिता भोसले-निकम | - | प्रभारी नगरसचिव |
| मा. प्रशांत वाघमारे | - | शहर अभियंता |
| मा. श्रीमती प्रतिभा पाटील | - | उपायुक्त(सामान्य प्रशासन) |
| मा. श्रीमती आशा राऊत | - | उपायुक्त, माध्यमिक विभाग |
| मा. संजय शिंदे | - | उपायुक्त, परिमंडळ क्र. ३ |
| मा. अनिरूध्द पावसकर | - | अधि. अभि.(पथ) |
| मा. श्रीमती नीना बोराडे | - | आरोग्यप्रमुख |
| मा. संदीप कदम | - | उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) |
| मा. नंदकिशोर जगताप | - | मुख्य अभि.(पा.पु.) |
| मा. युवराज देशमुख | - | अधि.अभि.(भवन, प्रकल्प) |
| मा. संतोष तांदळे | - | अधि.अभि.(मलनिःसारण) |
| मा. सोमनाथ बनकर | - | अतिक्रमण विभाग प्रमुख |
| मा. दांडगे | - | अधि.अभि.(पथ) |
| मा. जोशी | - | अभियंता.(पा.पु.) |

## कार्यपत्रिकेवरील विषय

### मा. उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र.३१७**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.३कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगड रोड, धनकवडी-सहकारनगर, व वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयाकडील १४ मुद्द्यांबाबतचा माहे जुलै २०२४ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र.३यांचे जा.क्र.उआप-३/३४५८, दि.०८/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय- सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.३१८**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.२कार्यालयाचे नियंत्रणाखालील औंध-बाणेर, शिवाजीनगर-घोलेरोड, व कोथरूड-बावधन क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतचा माहे जुलै २०२४ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.२/२८५, दि.१२/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय- सदर विषयाची नोंद घेतली.**

### माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र.३१९**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.१, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६/०७/२०२४ ते दि.३१/०७/२०२४ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.१/२५२, दि.०७/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय- सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.३२०**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.४, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६/०७/२०२४ ते दि.३१/०७/२०२४ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.४/२७८, दि.०९/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय- सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.३२१**

दिनांक २२/०७/२०२४ ते दिनांक २८/०७/२०२४अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण २४ आगींबाबत मा. अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/२५१, दि.०७/०८/२०२४ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र.३२२**

दिनांक २९/०७/२०२४ ते दिनांक ०४/०८/२०२४अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत लागलेल्या एकूण २४ आगींबाबत मा. अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.मआ/अग्निशमन/२७७, दि.०९/०८/२०२४ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेतली.**

<u>**सर्वात कमी रकमेचे टेंडर्स**</u>

**विषय क्र.३२३**

प्रभाग क्र. ८ मधील तथागत गौतम बुद्ध विपश्यना विहार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका या ठिकाणी अर्धवट राहिलेली कामे पूर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. AG ASSOCIATES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४८९२५६१/- पेक्षा १७.९९०% ने कमी) असल्याने यांचेकडून र.रु४०,१२,३८९=२८अधिक जी.एस.टी. र.रु. ७,२२,२३०/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु. ६४,२०५/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.८,९७५/- पर्यंत अशी एकुण र.रु. ४८,०७,७९९=२८ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/२५६, दि.०८/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३२४**

प्रभाग क्र.८ संजय गांधी दवाखान्याचे उर्वरित कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. ROHIT CONSTRUCTIONS यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६३,२९,४५१/- पेक्षा ०.५२०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६२,९६,५३७=८५ अधिक जी.एस.टी र.रु.११,३३,३७७/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.१२,९७१/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.१७,९५०/- पर्यंत अशी एकूण र.रु.७४,६०,८३५=८५ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढसुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करुन, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/२५९, दि.०८/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३२५**

प्र.क्र.९ बाणेर स.नं. १९८ ते २०५, २०६ येथे क्रीडांगण विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.M/s. R. R. DHOTRE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६५,८९,८५६/- पेक्षा ६.०० ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६१,९४,४६४=६४ अधिक जी.एस.टी. र.रु.११,१५,००४/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.२,०४,९३९/- पर्यंत अधिक मटेरिअलटेस्टिंग चार्जेस र.रु.१८,५८०/- पर्यंत अशी एकूण र.रु.७५,३२,९८७=६४/- पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/२६०, दि.०८/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३२६**

धनकवडी-सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यावर पाणीपुरवठा वाहिनी / मलःनिसारण वाहिनी / गॅस वाहिनी / वीज वाहिनी तसेच केबल खोदाईचे रिईन्सटेटमेंट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे. (भाग 1) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे.M/s. Kashinath Sitaram Kumawat, यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेडर र.रु.८४,४५,१९०/- पेक्षा २८.८५% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६०,०८,७५२=६९अधिक जी.एस.टी र.रु.१०,८१,५७५/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.२१,६१८/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.१३,००५/- पर्यंत अशी एकूण र.रु.७१,२४,९५०=६९ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/२६४, दि.०८/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३२७**

सिंहगड क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यांवर पाणीपुरवठा वाहिनी / मलःनिसारण वाहिनी / गॅस वाहिनी तसेच केबल खोदाईचे रिईन्सटेटमेंट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे.(भाग१) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेडर्स पैकी ठेकेदार मे. GAJANAN CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु.८४,०९,८०३/- पेक्षा २५.१५% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६२,९४,७३७=५५ अधिक जीएसटी र.रु.११,३३,०५३/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.७५,६६३/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.७५,०३,४५३=५५ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (२३-०४-२०२४) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/२६७, दि.०८/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३२८**

भवानी पेठ कार्यालयांचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यांवर पाणीपुरवठा वाहिनी / मलःनिसारण वाहिनी / गॅस वाहिनी / वीज वाहिनी तसेच केबल खोदाईचे रिईन्सटेटमेंट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे.(भाग२) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Malang Construction यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४,५६,६३१/- पेक्षा ४.५०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु८०,७६,०८२=६१ अधिक जीएसटी र.रु.१४,५३,६९५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.२०,५३७/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.९५,५०,३१४=६१ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/२७०, दि.०८/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३२९**

कार्यकारी अभियंता क्र.१ स्वारगेट पाणीपुरवठा अंतर्गत येणाऱ्या सॅलिसबरी पार्क, डायसप्लॉट, संदेशनगर, लुल्लानगर व लगतच्या परिसरात जलवाहिन्यांची दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SHREE GANESH ENTERPRISES यांचेटेंडरसर्वातकमीरकमेचे (टेंडरर.रु.५०,८२,९४६/- पेक्षा १५.८०% ने कमी) असल्यानेत्यांचेकडूनर.रु.४२,७९,८४०=५३ अधिक जीएसटी र.रु.७,७०,३७१/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/-पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.५०,५०,२११=५३ तसेच ब पाकीट उघडलेचे दिनांक (१५/०३/२०२४) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.२५,००,०००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति. महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पा.पु./२७३, दि.०८/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३३०**

कार्यकारी अभियंता क्र.१ स्वारगेट पाणीपुरवठा अंतर्गत येणाऱ्या मुकुंदनगर, गुलटेकडी, प्रेमनगर सोसायटी व लगतच्या परिसरात जलवाहिन्यांची दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदारमे.M/s. Kashinath Sitaram Kumawat यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेडर र.रु.५०,८४,६३८/- पेक्षा २५.८५% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३७,७०,२५९=०८ अधिक जीएसटी र.रु.६,७८,६४७/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४४,४८,९०६=०८ तसेच ब पाकीट उघडलेचे दिनांक (१३/०६/२०२४) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.२५,००,०००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति. महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पा.पु./२७४, दि.०८/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३३१**

पुणे मनपाच्या पाणीपुरवठा खात्याकडील विविध जलकेंद्रासाठी पॉली अल्युमिनियम क्लोराईड द्रावण (IS १५५७३:२००५/२०१८) नुसार पुरविणे. (मेक ग्रासिम/आर्कील/GACL/मे.आंध्रा शुगर्स लिमिटेड) या कामी विशेष बाब म्हणून निविदा क्र. १४/२०२३ अंतर्गत मान्य ठेकेदार मे. एस. व्ही. एस. केमिकल कॉर्पोरेशन एलएलपी यांचेकडून पूर्वीचे मान्य ३६६१ मे. परिमाण करिता र. रु. १०४९५/- प्रती मे. टन प्रमाणे र. रु. ३,८४,२२,२२४=२८ + १८% GST र. रु. ६९,१६,०००/- प्रमाणे र. रु. ४,५३,३८,२२४=२८ व वाढीव परिमाण ८०० मे. टन करिता र. रु. ८३,९६,०००/- + (१८% GST) र. रु. १५,११,२८०/- प्रमाणे एकूण र. रु. ९९,०७,२८०/- एकूण निविदा परिमाण ४४६१ मे. टन करिता र. रु. ५,५२,४५,५०४.२८/- पर्यंत दि. २९/०७/२०२४ पासून पॉलीअल्युमिनियम क्लोराईड द्रावण खरेदी करणेसाठीखालील बाबींस मान्यता मिळणे बाबतमा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पा.पु./२७५, दि.०८/०८/२०२४ चे पत्र.

१) पुणे मनपाच्या पाणीपुरवठा खात्याकडील विविध जलकेंद्रासाठी पॉलीअल्युमिनियम क्लोराईड द्रावण (IS १५५७३:२००५/२०१८) नुसार पुरविणे. (मेक ग्रासिम/आर्कील/GACL/मे. आंध्रा शुगर्स लिमिटेड) या कमी विशेष बाब म्हणून निविदा क्र. १४/२०२३ अंतर्गत मान्य ठेकेदार मे. एस. व्ही. एस. केमिकल कॉर्पोरेशन एलएलपी यांचेकडून पूर्वीचे मान्य ३६६१ मे. परिमाण करिता र. रु. १०४९५/- प्रती मे. टन प्रमाणे र. रु. ३,८४,२२,२२४=२८ + १८% GST र. रु.

६९,१६,०००/- प्रमाणे र. रु. ४,५३,३८,२२४=२८ व वाढीव परिमाण ८०० मे. टन करिता र. रु. ८३,९६,०००/- + (१८% GST) र. रु. १५,११,२८०/- प्रमाणे एकूण र. रु. ९९,०७,२८०/- एकूण निविदा परिमाण ४४६१ मे. टन करिता र. रु. ५,५२,४५,५०४=२८ पर्यंत दि. २९/०७/२०२४ पासून पॉलीअल्युमिनियम क्लोराईड द्रावण खरेदी करणेस,

२) क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वाढीव परिमाण खरेदीसाठी मे. एस. व्ही. एस. केमिकल कॉर्पोरेशन एलएलपी यांचे सोबत करारनामा करणेस व त्यांचेकडून अनामत रक्कम भरुन घेणेस,

३) वरील प्रमाणे खरेदी केलेल्या परिमाणाचे बिल पुरवठादारास अदा करणेस

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३३२**

वडगाव जलकेंद्र येथे संतोषनगर व तळजाई झोनसाठी एच.टी ट्रॉन्सफॉर्मर बसविणे व तदनुषंगीक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. NEW SOLAR ELECTRICALS AND ELECTRONICS यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८३,९०,३३१/- पेक्षा ५.५०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७९,२८,८६२=८ अधिक जी.एस.टी र.रु.१४,२७,१९५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु. ०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु. ०/- पर्यंत अशी एकूण र.रु.९३,५६,०५७=७९ तसेच वर्क ऑर्डर दिनांका पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र. रु.९९,००,५९१) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/पा.पु./२७६, दि.०८/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३३३**

घोले रोड क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यांवर पाणीपुरवठा वाहिनी/ मलनिःसारण वाहिनी/ गॅस वाहिनी/ वीज वाहिनी तसेच केबल खोदाई केलेल्या ठिकाणी रिइंस्टेटमेंट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे.(भाग १)कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/S SOHAM SANJAY KATE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४,३२,७६५/- पेक्षा ४२.५१% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४८,४७,९९६=६ अधिक जीएसटीर.रु.८,७२,६३९/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.४८,६४१/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु. ०/- पर्यंत अशी एकूण र.रु.५७,६९,२७६=६ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/२८०, दि.०९/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३३४**

सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यांवर पाणीपुरवठा वाहिनी/ मलनिःसारण वाहिनी/ गॅस वाहिनी/ वीज वाहिनी तसेच केबल खोदाईचे रिइंस्टेटमेंट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे.(भाग २) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. DATTATRAY NAMDEORAO BARGE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४,४८,८८७/- पेक्षा ३८% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५२,३८,३०९=९४ अधिक जीएसटीर.रु.९,४२,८९६/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.२९,३४६/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु. ०/- पर्यंत अशी एकूण र.रु.६२,१०,५५१=९४ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (१३-०३-२०२४) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/२८६, दि.१२/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३३५**

कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांतर्गतचेकार्यक्षेत्रात विविध रस्त्यांवर पाणीपुरवठा वाहिनी/ मलनिःसारण वाहिनी/ गॅस वाहिनी/ वीज वाहिनी तसेच केबल खोदाईचे रिइंस्टेटमेंट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे.(भाग १) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे.Sandip Enterprises यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४,४६,९२०/- पेक्षा ३८.८०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५१,६९,५१५=०४ अधिक जीएसटीर.रु.९,३०,५१३/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.३२,४२७/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु. ०/- पर्यंत अशी एकूण र.रु.६१,३२,४५५=०४ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (१५-०३-२०२४) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/२८७, दि.१२/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३३६**

मास्टर प्लॅन नुसार भैरोबा सिवेज डिस्ट्रीक (SD-3) अंतर्गत खडके वस्ती, श्रेयेश नगर सरगम चाळ ते शिवराय नगर बिबवेवाडी येथे अपुऱ्या क्षमतेच्या मलवाहिन्या बदलणे व आवश्यक क्षमतेच्या मोठ्या व्यासाच्या मलवाहिन्या विकसित करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ८ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. AMOL ENTERPRISES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८३,८५,३०१/- पेक्षा ०.९९०% ने कमी) असल्याने त्याचे कडून र.रु.८३,०२,२८६=५२ अधिक जी.एस.टी.

र.रु.१४,९४,४१२/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.४८,६५८/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.५६,६८५/- पर्यंत अशी एकूण र.रु.९९,०२,०४१=५२ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (इ)यांचे जा.क्र.मआ/मलनि/२९०, दि.१२/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

<u>मागील सभेचे विषय</u>

**विषय क्र.**३३७

पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील वाहनतळांचे बाबतीत कोवीड–१९ या साथरोगाचे कालावधीतील वार्षिक मक्ता रकमेमध्ये काही प्रमाणात सवलत मान्य करणेबाबत मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेता, मा.आबा बागुल व मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि. १२/४/२०२१ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १११ दि. १२/४/२०२१ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/प्रकल्प/८०७ दि.३/११/२०२१ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

**(टीप:- सदर विषयाचा विचार २ महिन्यानंतर करण्यात यावा, असे दि.११/०६/२०२४ च्या सभेत ठरले होते.)**

**निर्णय– सदर विषयाचा विचार दोन महिन्यांनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.**३३८

भूमीगत केबलसाठी आकारणी करावयाच्या मालमत्ता कराच्या धोरणाबाबत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टिजीओ/४२२ दि.१०/८/२०२१ चे पत्र.

**(टीप:- सदर विषयाचा विचार २ महिन्यानंतर करण्यात यावा, असे दि.११/०६/२०२४ च्या सभेत ठरले होते.)**

**निर्णय– सदर विषयाचा विचार दोन महिन्यांनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.**३३९

पुणे महानगरपालिकेच्या उद्यानांचे प्रवेशशुल्कामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्ठ क्र. १ मधील अ.क्र. १ ते १३ उद्यानांचे सद्य:स्थितीत असलेले प्रचलित प्रवेशशुल्क वाढवून उद्यानांचे प्रवेशशुल्क प्रस्तावित दरांप्रमाणे प्रौढांसाठी र.रु.१०/– व लहान मुलांसाठी र.रु. ५/–, मासिक पास र.रु. २००/– व विदेशी नागरिक र.रु. १००/– दैनंदिन तिकीट याप्रमाणे आकारणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उदयान/१४२ दि.२९/६/२०२० चे पत्र.

**(टीप:- सदर विषयाचा विचार २ महिन्यानंतर करण्यात यावा, असे दि.११/०६/२०२४ च्या सभेत ठरले होते.)**

**निर्णय– सदर विषयाचा विचार दोन महिन्यांनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.३४०**

पुणे महानगरपालिकेचा कोंढवा येथील बीफ कत्तलखाना खासगी संस्थेस १० वर्षे कालावधीपर्यंत चालविणेसाठी कराराने भाडेतत्वावर देणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी मे. एशियन फुड्स मिम एग्रो यांची निविदा दोघात सर्वाधिक दर देणारी असल्याने त्यांचेकडून काम करून घेणेसाठी त्याकरिता करारनामा करणेस खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१६४९,दि.२६/०२/२०२४ चे पत्र.

१. पुणे महानगरपालिकेचा कोंढवा येथील बीफ कत्तलखाना खाजगी संस्थेस १० वर्ष कालावधीपर्यंत चालविणेसाठी कराराने भाडे तत्वावर देणेबाबत या कामाकरिता मे एशियन फुड्स मिम एग्रो, ११-५- (५३१/A), बाजारघाट रोड नामपल्ली, हैदराबाद, तेलंगाना यांच्याकडून काम करून घेणेस, त्याकरीता करारनामा करणेंस
२. मे.एशियन फुड्स मिम एग्रो यांच्याकडून खालीलप्रमाणे वर्ष निहाय भाडेपोटी वार्षिक शुल्क R130B101 मध्ये जमा करून घेणेस

| अ.क्र. | वर्ष | वार्षिक शुल्क |
|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष (Mobilization period) | रु.१,१५,२०,०००/- |
| २ | द्वितीय वर्ष (Mobilization period) | रु.१,२०,९६,०००/- |
| ३ | दोन वर्षाच्या (Mobilization period) कालावधी नंतर तिसऱ्या वर्षापासून | १) Fixed Cost र.रु. ७७,६४,४७३=२३ अधिक प्रती दिन प्रत्यक्षात कटाई होणाऱ्या जनावराच्या संख्येप्रमाणे र.रु. ८०/- कटाई शुल्क <u>**अथवा**</u><br>२) रु.१,१५,२०,०००/- यापैकी जास्त येणारी रक्कम ५% वार्षिक भाववाढ प्रमाणे इतके शुल्क भरणे बधनकारक राहील. |

निविदा अटी व शर्तीनुसार संबंधित ठेकेदाराकडून कायदिश दिल्यानंतर एक वर्षाचे शुल्क म्हणजेच र.रु.१,१५,२०,०००/- पुणे महानगरपालिकेकडे आगाऊ भरून घेणे व दर वर्षी र.रु.२५ लक्षची परफॉरमन्स बँक गॅरंटी घेणे.

**(टीप:- सदर विषयाचा विचार २ महिन्यानंतर करण्यात यावा, असे दि.११/०६/२०२४ च्या सभेत ठरले होते.)**
**निर्णय– सदर विषयाचा विचार दोन महिन्यांनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.३४१**

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पूरग्रस्त, गवनि पुनर्वसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मा. स्थायी समिति मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सीएसओ/१३९३, दि.१८/०२/२०१९ चे पत्र.
**(टीप:- सदर विषयाचा विचार २ महिन्यानंतर करण्यात यावा, असे दि.११/०६/२०२४ च्या सभेत ठरले होते.)**
**निर्णय– सदर विषयाचा विचार दोन महिन्यांनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.३४२**

आरोग्य कार्यालयाकडील विविध विभागामार्फत सध्याच्या आकारण्यात येणारे प्रस्तावित मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या शुल्क दरात वाढ करून प्रस्तावित केलेल्या शुल्क दि.०१/०४/२०२१ पासून आकारणीस करण्यास मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१००७, दि.२२/०३/२०२१ चे पत्र.
**(टीप:- सदर विषयाचा विचार २ महिन्यानंतर करण्यात यावा, असे दि.११/०६/२०२४ च्या सभेत ठरले होते.)**
**निर्णय– सदर विषयाचा विचार दोन महिन्यांनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.३४३**

पुणे शहरातील हॉस्टेल, पेईंगगेस्ट, गेस्ट हाउस, सर्विस अपार्टमेंट कर आकारणी बाबत खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/Tax/१०३४, दि.१३/१२/२०२३ चे पत्र.

१) पुणे शहरातील खासगी मालकीचे हॉस्टेल, पेईंगगेस्ट, गेस्ट हाऊस, सर्व्हिस अपार्टमेंटची कर आकारणी त्या त्या विभागातील वाजवी भाड्याच्या बिगरनिवासी दराने व प्रचलित मिळकत कर आकारणी धोरणानुसार करण्यात यावी.
२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १३२ चे तरतुदीस अधीन राहून शासन मान्यताप्राप्त तसेच धर्मदाय नोंदणीकृत शैक्षणिक संस्था, धार्मिक संस्था यांचे मालकीचे हॉस्टेल, पेईंगगेस्ट, गेस्ट हाऊस, सर्व्हिस अपार्टमेंटची कर आकारणी त्या त्या विभागातील वाजवी भाड्याच्या निवासी दराने व प्रचलित मिळकत कर आकारणी धोरणानुसार करण्यात यावी.

**(टीप:- सदर विषयाचा विचार २ महिन्यानंतर करण्यात यावा, असे दि.११/०६/२०२४ च्या सभेत ठरले होते.)**
**निर्णय– सदर विषयाचा विचार दोन महिन्यांनंतर करण्यात यावा.**

**विषय क्र.३४४**

पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रुग्णालय, राजीव गांधी हॉस्पिटल, जयाबाई सुतार हॉस्पिटल, डॉ.नायडू सांसर्गिक हॉस्पिटल, सोनावणे हॉस्पिटल व इतर हॉस्पिटलची अंतर्गत व बाह्य परिसराची जंतूनाशकासहित यांत्रिकी पद्धतीने आउटसोर्सिंगद्वारे साफ सफाईचे काम करून घेणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/२०४, दि.२६/०७/२०२४ चे पत्र.

१. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात पात्र निविदाधारक श्री एंटरप्रायजेस यांच्याकडून र.रु.७.७२१/- प्रतीमहा प्रती स्वे.फूट जी.एस.टी. वगळून पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रुग्णालय, राजीव गांधी हॉस्पिटल, जयाबाई सुतार हॉस्पिटल, डॉ.नायडू सांसर्गिक हॉस्पिटल, सोनावणे हॉस्पिटल व इतर हॉस्पिटलची अंतर्गत व बाह्य परिसराची जंतूनाशकासहितयांत्रिकी पद्धतीने आउटसोसिंगद्वारे साफसफाईचे काम करून घेणेस व खालील अर्थशीर्षकावरबिलाची रक्कम खर्ची टाकून व त्यांचे बिल अदा करणेस व त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस
२. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात पात्र निविदाधारक श्री एंटरप्रायजेस यांच्याकडून ७.७२१/- प्रतीमहा प्रती स्क्वे.फुट जी.एस.टी. वगळून पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू रुग्णालय, राजीव गांधी हॉस्पिटल,जयाबाई सुतार हॉस्पिटल, डॉ.नायडू सांसर्गिक हॉस्पिटल, सोनावणे हॉस्पिटल व इतर हॉस्पिटलची अंतर्गत व बाह्य परिसराची जंतुनाशकासहित यांत्रिकी पद्धतीने आउटसोर्सिंगद्वारे साफसफाईचे काम करून घेणेस व खालील अर्थशिर्षकावर बिलाची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस व त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस

अर्थशिर्षक सन २०२४-२५ (RE17F140B)
कमला नेहरू रुग्णालय व इतर रुग्णालययेथे यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करणे
विविध सेवक वर्ग ठेकेदार पद्धतीने नेमणे,
मान्य तरतूद रक्कम रुपये-७,००,००,०००/-

**(टीप:- सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.०९/०८/२०२४ च्या सभेत ठरले होते.)**
**निर्णय– सदर विषयास दोन वर्षासाठी १४ कोटी रूपये अधिक जी.एस.टी. पर्यंत खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

**विषय क्र.३४५**

पुणे महानगरपालिकेच्या मुख्य अग्निशमन केंद्र व त्याच्या नियंत्रणाखालील १३ उप अग्निशमन केंद्र तसेच नव्याने बांधण्यात आलेल्या ५ अग्निशमन केंद्राकरिता सरळ सेवेने कर्मचारी नियुक्ती होईपर्यंत कंत्राटी पद्धतीने २०० मदतनीस कर्मचारी घेणेसाठी निविदा रक्कमे पेक्षा अधिक होणारी रक्कम अदा करणेस मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील तक्त्यानुसार निविदा र.रु.५,३८,६७,४२६=४९ पैकी र.रु.५,२४,८७,६६२/- इतका खर्च करण्यात आला असून उर्वरित र.रु.१३,७९,७३४=८७ शिल्लक रहात आहे. निविदाधारकाने सादर केलेल्या र.रु.२०,८४,२५३=६० चे बिलाकरिता र.रु.७,०४,५१८=३२ इतकी तरतूद अपुरी पडत आहे. तरी सदर र.रु.२०,८४,२५३=६० चे बिल निविदादारांना अदा करणेसाठी खात्याकडील SI25A129AB या अर्थशीर्षकावर पुरेशी तरतूद उपलब्ध असल्याने निविदा र.रु.५,३८,६७,४२६=४९ पेक्षा र.रु.७,०४,५१८=३२ अधिकची रक्कम हि वेतन दरात नवीन वाढीव डी.ए. (महागाई भत्ता) ची वाढ झाल्यामुळे ठेकेदार मे.जय शंकर असोशिएट्स पुणे यांना अदा करणेस मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/अग्निशमन/२२१, दि.२९/०७/२०२४ चे पत्र.

**(टीप:- सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि.०९/०८/२०२४ च्या सभेत ठरले होते.)**

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**संकीर्ण**

**विषय क्र.३४६**

औंध बाणेर क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सुस गाव परिसरात रस्ते ग्राउट व डांबरीकरण करणे आणि इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे या कामांना र.रु.२७५ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.२/२५४, दि.०८/०८/२०२४ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| मा.मुख्य अभियंता (पथ )<br>सन२०२४-२५ अंदाजपत्रकीय तरतूद,<br>पान क्र.१६१, यादी क्र.A18 नविन समाविष्ट गावांमध्ये रस्ते विकसित करणे,<br>पुणे मनपामध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये रस्ते विकसित करणे. CE20A1266/A18-112 | २७५लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेली कामे:-**<br>औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालय<br>१) सुस येथील भगवतीनगर मधील मज्जित समोरील लेन १ व २ येथील रस्ता ग्राऊट व डांबरीकरण करणे. | --- | २५ लक्ष |
| २) सुस येथील सुनिल चांदेरे यांच्या घरापासून ते शितळा देवी मंदिरापर्यंतचा रस्ता ग्राऊट व डांबरीकरण करणे. | --- | २५ लक्ष |
| ३) सुस येथील योगेश काळभोर यांच्या घरापासून ते चंद्रकांत काळभोर यांच्या घरापर्यंतचा रस्ता ग्राऊट व डांबरीकरण करणे. | --- | २५ लक्ष |
| ४) सुस येथील भगवतीनगर व विविध परिसरातील खराब रस्ते दुरुस्त व डांबरीकरण करणे. | --- | २५ लक्ष |
| ५) सुस येथील शिवबा चौक ते नाना ससार यांच्या जुन्या घरापर्यंत इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे. | --- | २५ लक्ष |
| ६) सुस गावठाण येथील नाना ससार यांच्या जुन्या घरापासून ते मानमोडे यांच्या घरापर्यंत इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे. | --- | २५ लक्ष |
| ७) सुस येथील मानमोडे यांच्या घरापासून पूर्व बाजूने निकाळजे वस्तीकडे जाणाऱ्या रस्त्यावर इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे. | --- | २५ लक्ष |
| ८) सुस येथील भैरवनाथ मंदिराच्यामागच्या बाजूने ते मानमोडे यांच्या घरापर्यंत इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे. | --- | २५ लक्ष |
| ९) सुस येथील देशपांडे यांच्या दुर्गा माता मंदिरा पासून ते सरपंच अंजना चांदेरे यांच्या घरापर्यंत इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे. | --- | २५ लक्ष |
| १०) सुस गावठाणमधील पूर्व बाजूस उर्वरित ठिकाणी इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे. | --- | २५ लक्ष |
| ११) सुस गावठाणमधील पश्चिम बाजूस उर्वरित ठिकाणी इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे. | --- | २५ लक्ष |

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३४७**

औंध बाणेर क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सुस गाव परिसरात रस्ते ग्राउट व डांबरीकरण करणे या कामांच्या खालीलप्रमाणे र.रु.१०० लक्ष च्या वर्गीकरणास मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.२/२८२, दि.०९/०८/२०२४ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| मा. मुख्य अभियंता(पथ)<br>सन २०२४-२५ अंदाजपत्रकीय तरतूद,<br>पान क्र.१४५, पथ विभागाकडील कामाच्या याद्या, यादी क्र.A2 | | |

| | | |
|---|---|---|
| शहरामधील रस्ते विकसित करणे आणि डांबरीकरण करणे,<br>सुस येथील PMRDA कडून ताब्यात आलेले रस्ते विकसित करणे.<br>CE20A102/A2-1898 र.रु.११५.०० लक्ष | १०० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेली कामे:-**<br>औंध-बाणेर क्षेत्रीय कार्यालय<br>१)सुस येथील पारखेवस्ती वरील गणपती मंदिराजवळील मयूर काळे यांच्या घरापासून ते सौरभ वाघचौरे यांच्या घरापर्यंतचा रस्ता ग्राऊट व डांबरीकरण करणे. | --- | २५ लक्ष |
| २) सुस येथील भगवतीनगर येथील राजू ट्रेडर्स यांच्या दुकानापासून ते मंगेश भंडारे यांच्या घरापर्यंतचा रस्ता ग्राऊट व डांबरीकरण करणे. | --- | २५ लक्ष |
| ३) सुस येथील भगवतीनगर येथील गवळीबाई ते नदाफ बंगल्यापर्यंतचा रस्ता ग्राऊट व डांबरीकरण करणे. | --- | २५ लक्ष |
| ४) सुस येथील भगवतीनगर मधील अनिस शेख यांच्या घरापासून ते शिंदे यांच्या घरापर्यंतचा रस्ता ग्राऊट व डांबरीकरण करणे | --- | २५ लक्ष |

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३४८**

मालमत्ता व व्यवस्थापन विभागाने पीएमपीएमएलला भाडेतत्वावर दिलेल्या जागांचे भाडेबाबत खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/२८९, दि.१२/०८/२०२४ चे पत्र.

१) पुणे महानगरपालिकेचे आर्थिक हित विचारात घेऊन मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडून पीएमपीएमएला भाडेतत्वावर दिलेल्या मा. महापालिका आयुक्त यांच्या विषयपत्रातील नमूद केलेल्या जागांचे भाडेथकबाकी व जागांचे आकारण्यात येणारे भाडे कायमस्वरूपी माफ करता येणार नाही असे लेखी कळविणेस.

२) मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडून पीएमपीएमएला एकूण २३ मोकळ्या जागा व ०३ बांधीव जागा भाडेतत्वावर देण्यात आलेल्या असून माहे ऑगस्ट २०२२ ते मे २०२४ अखेर RI 22A 101 (भूमी) या अर्थशिर्षकावर र.रु. १३,४७,६३,५३५/- व RI 22A 103 (भवन) या अर्थशिर्षकावर र.रु.२,२६,१८२/- एकूण र.रु. १३,४९,८९,७१७/- फक्त भाडे रक्कम येणे असून सदर भाडेरक्कम पीएमपीएमएलला अदा करावयाच्या संचलन तूटीच्या RE58A101A रकमेतून वळती करून जमा करून घेणेस.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३४९ त्वर्य**

मोटार वाहन विभागाकडील सन २०२४-२५ मधील RE21C117, RTO विषयक कामे करणे या अर्थशिर्षकावरील या कामी उपलब्ध असलेली तरतूद अपुरी असल्याने सदरची कमी पडणारी रक्कम खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करणेस मा. स्थायी मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मोवावि/२९२, दि.१४/०८/२०२४ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| घनकचरा व्यवस्थापन विभाग<br>यांत्रिकी पद्धतीने रस्त्यांची सफाई करणे/इलेक्ट्रिक व्हॅक्युम रोड स्वीपिंग मशीन बीओटी/भाडेतत्वावर घेणे (व्हे.डेपो)<br>RE19A146 | २ कोटी | --- |
| **नवीन सुचविलेले काम-**<br>मोटार वाहन विभाग<br>RTO विषयक कामे करणे<br>RE21C117 | --- | २ कोटी |

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३५० त्वर्य**

पुणे शुक्रवार पेठ येथील हिराबाग चौक ते सुभाषनगर रोड यांना जोडणारा ७.५मी. रुंदीचा रस्ता हा कलम २१० अन्वये ९.०० मी. रस्तारुंदी करणेबाबत महाराष्ट्र महापालिका आधिनियम१९४९ चे कलम २१० अन्वये बांधकाम विकास विभागाने सादर केलेल्या नकाशात दर्शविल्यानुसार ९.०० मी. रुंदीची रस्ताप्रमाणरेषा कायम करणेस व जाहिर प्रकटनाद्वारे नागरिकांच्या हरकती/सुचना मागविण्यासाठी मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भूसंपादन/२९३, दि.१४/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.३५१ त्वर्य**

पुणे पेठ एरंडवणा फा. प्लॉट ५१ व ५२ येथील डॉ. केतकर पथ ते महर्षी कर्वे रोड यांना जोडणारा ७.५ मी. रुंदीचा रस्ता हा कलम २१० अन्वये ९.०० मी. रस्तारुंदी करणेबाबत महाराष्ट्र महापालिका आधिनियम१९४९ चे कलम २१० अन्वये बांधकाम विकास विभागाने सादर केलेल्या नकाशात दर्शविल्यानुसार ९.०० मी. रुंदीची रस्ताप्रमाणरेषा कायम करणेस व जाहिर प्रकटनाद्वारे नागरिकांच्या हरकती/सुचना मागविण्यासाठी मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भूसंपादन/२९४, दि.१४/०८/२०२४ चे पत्र.

**निर्णय– सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

**स्वाक्षरी/–xxx**
**(योगिता भोसले)**
**प्र.नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**वृत्तांत मंजूर.**

**स्वाक्षरी/–xxx**
**(डॉ.राजेंद्र भोसले)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**